# सर्वसाधारण सभा

दि. ०६/१०/२०२४ वार : रविवार

ठिकाण:-प्रधान कार्यालय, मॉडेल कॅालनी,पुणे

वेळ:- दुपारी २:३० वाजता.

उपस्थिति:-

| | | |
|---|---|---|
| १. श्री. निलेशजी शामलालजी लाहोटी | २. श्री.राजीवजी जु. मुंदडा | ३. श्री.विठ्ठलजी मणियार |
| ४. श्री.रमेशजी धूत | ५. श्री.माणकचंदजी काबरा | ६. श्री.नंदकिशोरजी राठी |
| ७. डॉ.अशोकजी लड्ढा | ८. श्री.रामनिवासजी लड्डा | ९. श्री.अनुपजी बियाणी |
| १०. श्री.राजेन्द्रजी मंत्री | ११. श्री.रविजी काबरा | १२.डॉ.रमणलालजी क.भुतडा |
| १३. श्री.योगेशजी बियाणी | १४. सी.ए.श्री.सचिनजी भट्टड | १५. श्री.बजरंगजी लोहिया |
| १६. श्री.सुयोगजी नवाल | १७. श्री.लक्ष्मीनारायणजी मुंदडा | १८. श्री.हरिश्चंद्रजी चांडक |
| १९. श्री.सुभाषजी रा.जाजु | २०. श्री.सुरेशजी मु.नावंदर | २१. श्री.नयनजी रा. नोगजा |
| २२. श्री.संजयजी डागा | २३. श्री.राजेन्द्रजी आसावा | २४. श्री.संजयजी जाखोटीया |
| २५.श्री.उज्वलजी तापडिया | २६.श्री.प्रमोदजी व्दा.भुतडा | २७. श्री.दर्शनजी पी.मुंदडा |
| २८.श्री.बालकृष्णजी करवा | २९.श्री.गिरिधारीजी भुतडा | ३०. श्री.ओमप्रकाशजी सोमाणी |
| ३१.श्री.विष्णुकांतजी मानधन्या | ३२.श्री.विनोदजी करवा | ३३. श्री.सुभाषजी लोहिया |
| ३४.श्री.मधुसुदनजी सारडा | ३५.श्री.मनोजजी वि.कासट | ३६. श्री.मनिषजी कासट |
| ३७.श्री.सचिनजी चांडक | ३८.श्री.सत्यनारायणजी पलोड | ३९.श्री.व्दारकादासजी सारडा |
| ४०.श्री.कैलासजी नावंदर | ४१.श्री.अमितजी राठी | ४२.श्री.दर्शनजी के.मुंदडा |
| ४३.श्री.योगेशजी बजाज | ४४.श्री.अमोलजी मर्दा | ४५.श्री.चिरागजी राठी |
| ४६.सीए अजयजी नवाल | ४७.सीए.वीनाजी चांडक़ | ४८.श्री.अमितजी चांडक |
| ४९.श्री.कैलासजी सिकची | ५०.श्री.निर्मलजी तोष्णीवाल | ५१.श्री.अमोलजी करवा |
| ५२.श्री.महेशजी मालपाणी | ५३.श्री.घनश्यामजी झंवर | ५४.श्री.मधुसुदनजी करवा |
| ५५.श्री.लक्ष्मीकांतजी मनियार | ५६.श्री.अभिजीतजी कासट | ५७.श्री.निखिलजी कलंत्री |
| ५८.श्री.जवाहरजी जाखेटिया | ५९.श्री.आनंदजी भंडारी | ६०.श्री.मनिषजी रामचंद्रजी भट्टड |
| ६१.श्री.लक्ष्मीकांतजी सोमाणी | ६२.श्री.निलेशजी पोफलिया | ६३.सीए.सुनिलजी माहेश्वरी |
| ६४.श्री.नंदकिशोरजी भरडिया | ६५.सी.गोपालजी जाजु | ६६.श्री.किशोरजी चांडक |
| ६७.श्री.सचिनजी दरक | ६८.श्री.पंकजजी खडलोया | ६९.श्री.संजयजी झंवर |
| ७०.श्री.परागजी राठी | ७१.श्री.कृष्णकांतजी लखोटीया | ७२.श्री.अशिषजी मो.बिहाणी |
| ७३.श्री.रामप्रसादजी राठी | ७४.श्री.श्रीकांतजी लखोटीया | ७५.सीए सचिनजी मंत्री |
| ७६.श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर | ७७.सौ.मिनाक्षीजी सारडा | ७८.श्रीमती कल्पनाजी दमाणी |
| ७९.श्री.संजयजी लाहोटी | ८०.श्री.अनिलजी भुतडा | ८१.श्री.गोकुळजी लाहोटी |
| ८२.श्री.नंदकिशोरजी मुंदडा | ८३.श्री.जुगलकिशोरजी पुंगलिया | ८४.श्री.नंदकिशोरजी तोष्णीवाल |
| ८५.श्री.दीपकजी काबरा | ८६.सौ.निकिताजी मंत्री | ८७.श्री.संतोषजी तापडिया |
| ८८.सौ.नंदाजी बांगड | ८९.सौ.किर्तीजी लड्ढा | ९०.सौ.नम्रताजी जाजु |
| ९१.सौ.मंगलजी काबरा | ९२.डॉ.अर्चनाजी दरक | ९३.श्रीमती कांताजी काबरा |

९४.सौ.पुष्पाजी गो.राठी
९५.सौ.वंदनाजी मुंदडा
९६.श्रीमती शामलजी तोष्णीवाल
९७.सौ.प्रितीजी लाठी
९८.सौ.लताजी काबरा
९९.सौ.पुष्पाजी तोष्णीवाल
१००.सौ.अंजलीजी करवा
१०१.सौ.स्मिताजी मालपाणी
१०२.सौ.स्वातीजी मुंदडा
१०३.श्रीमती सावित्राजी मुंदडा
१०४.सौ.रेखाजी मंत्री
१०५.सौ.आशाजी भुतडा
१०६.सौ.सुर्यकांताजी मानधना
१०७.सौ.पुष्पाजी र.राठी
१०८.सौ.प्रतिभाजी काबरा
१०९.सौ.शीलाजी जाजु
११०.सौ.मंदाकिनीजी काबरा
१११.श्रीमती गीताजी राठी
११२.श्रीमती मालाजी चांडक
११३.श्रीमती निर्मलाजी लाहोटी
११४.श्री.भरतजी सोमाणी
११५.श्री.अभिषेकजी सारडा
११६.श्री.अमोलजी भट्टड
११७.श्री.शेखरजी मुंदडा
११८.सौ.सुशिलाजी राठी
११९.श्री.अतुलजी लाहोटी
१२०.श्री.अश्विनजी चांडक
१२१.सौ.सुरेखाजी करवा

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाची सर्वसाधारण सभा दि.०६.१०.२०२४ रोजी वरील सदस्यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली. मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सर्वांचे स्वागत केले व मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांना सभेचे अध्यक्षस्थान स्विकारण्याची विनंती केली येणेप्रमाणे श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेचे अध्यक्ष स्थान स्वीकारून पुनश:च सर्वांचे स्वागत केले. मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सांगीतले की, मंडळाच्या प्रथेप्रमाणे सभेच्या सुरूवातीला अहवाल वर्षात दिवंगत सदस्य, कार्यकर्त्यांना श्रध्दांजली अर्पीत करू. येणेप्रमाणे खालील दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात आली.

**शोकप्रस्ताव – ०७.११.२३ ते ३०.०९.२०२४**

| अ.क्रं | शोकप्रस्ताव भेजा हुआ दि, | शोकप्रस्ताव भेजा उनका नाम | गांव | रिश्ता | मृत व्यक्ति नांम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०७.११.२०२३ | सौ.शैलाजी केला | पुणे | माताजी | स्व.श्रीमती सुशीला देवी मोहता |
| २ | २३.११.२०२३ | श्री.सचिनजी दरक | पुणे | पापा | स्व. श्रीनिवासजी हिरालालजी दरक, पुणे |
| ३ | २३.११.२०२३ | श्रीमती.सरोजिनीजी हेडा | पुणे | पती | स्व. डॉ.रमेशजी रामबिलासजी हेडा , पुणे |
| ४ | २३.११.२०२३ | श्री.अनमोलजी हेडा<br>श्री.अनुपमजी हेडा<br>श्री.परिमलजी हेडा | पुणे | पिताजी | स्व. डॉ.रमेशजी रामबिलासजी हेडा , पुणे |
| ५ | २३.११.२०२३ | श्री.भरतजी बाहेती | पुणे | पिताजी | स्व.श्री.गोपीकिशनजी रामलालजी बाहेती,निलंगा |
| ६ | २७.११.२०२३ | श्रीमती कांचनजी जाजू | पुणे | पती | स्व. श्री. गोविंदलालजी किशनलालजी जाजू, कळंब |
| ७ | ०२.१२.२०२३ | श्रीमती शोभाजी रामकुमारजी राठी | पुणे | पती | स्व. श्री. रामकुमारजी हिरालालजी राठी, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ०२.१२.२०२३ | श्री.राहुलजी रामकुमारजी राठी | पुणे | पिताजी | स्व. श्री. रामकुमारजी हिरालालजी राठी, पुणे |
| ९ | २६.१२.२०२३ | श्री.नारायणजी सारडा | पुणे | पिताजी | स्व.श्री.दामोदरदासजी सावंलदासजी सारडा, पुणे |
| १० | ०६.०२.२०२४ | श्री.सुनिलजी बिहाणी श्री.अनिलजी बिहाणी | पुणे | माताजी | स्व.श्रीमती पद्मावतीजी रामकिसनजी बिहाणी |
| ११ | २६.०२.२४ | श्री.अनिलकुमारजी ब्रिजमोहनजी लड्ढा सौ. तनुजाजी लड्ढा | पुणे | बेटा | स्व. सौरभजी लड्ढा |
| १२ | २७.०३.२०२४ | श्री.राजिवजी बलदवा | सोलापूर | पिताजी | स्व. श्री. सुरेशजी रामकिशनजी बलदवा, सोलापूर |
| | | श्री.गिरीशजी बलदवा | सोलापूर | पिताजी | स्व. श्री. सुरेशजी रामकिशनजी बलदवा, सोलापूर |
| १३ | २७.०३.२०२४ | सौ.विजयाजी सुभाषजी लड्ढा | पुणे | बडे भाईसाहब | स्व. श्री. जुगलकिशोरजी सीतारामजी राठी, पुणे |
| १४ | २७.०३.२०२४ | सौ.आशाजी भुतडा | पुणे | भाईसाहब | स्व. श्री. सुरेशजी रामकिशनजी बलदवा, सोलापूर |
| १५ | २८.०३.२०२४ | श्री.ललितजी बूब | नासिक | पिताजी | स्व. श्री.प्रदीपजी किसनलालजी बूब, नासिक |
| १६ | ०६.०४.२०२४ | श्री.जुगलकिशोरजी मुंदडा | ठाणे | भाईसाहब | स्व. श्री. बालकिशनजी मुंदडा, ठाणे |
| | | श्री.राजीवजी मुंदडा | | चाचाजी | स्व. श्री. बालकिशनजी मुंदडा, ठाणे |
| १७ | | सौ.सुशिलाजी राठी | पुणे | भतिजी जवई | स्व.भगवानजी राठी, उदगीर |
| १८ | | सौ.सुशिलाजी राठी | पुणे | काकाजी | स्व.रामबिलासजी जाजू, बीड |
| | | सौ.सुशिलाजी राठी | पुणे | काकीजी | स्व.कमलाबाई जाजू, बीड |
| १९ | २५.०४.२०२४ | कांताजी काबरा | पुणे | भतीजी | स्व. सौ.श्वेताजी शामजी सोमाणी, नागपुर |
| २० | २३.०५.२०२४ | श्री.नंदकिशोरजी भराडिया | सोलापूर | पिताजी | स्व.बालकिसनजी रामबिलासजी भराडिया, सोलापूर |
| | | | | | |
| २१ | ०६.०६.२०२४ | श्री.संदिपजी चांडक सौ.आरतीजी चांडक | मुंबई | पिताजी ससुरजी | स्व.सत्यनारायणजी (सत्येन) चांडक , मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | ०६.०६.२०२४ | श्री.कमलजी कासट<br>सौ.लिनाजी कासट | मुंबई | ससुरजी<br>पिताजी | स्व.सत्यनारायणजी<br>(सत्येन) चांडक , मुंबई |
| २३ | १०.०६.२०२४ | श्री.वासुदेवजी बंग | सोलापूर | माताजी | स्व. पुष्पादेवी रंगनाथजी<br>बंग, सोलापूर |
| २४ | ०७.०७.२०२४ | श्री.ललितजी पोफले | पुणे | काकीजी | स्व सौ.आशाजी<br>व्दारकादासजी पोफले,<br>पुणे |
| २५ | ७.०७.२०२४ | श्री. लक्ष्मीकांतजी<br>नावंदर श्री. कैलाशजी<br>नावंदर | पुणे | बडे पापा | स्व सुभाषचंद्रजी नावंदर,<br>संगमनेर |
| २६ | ७.०७.२०२४ | श्री. पुरुषोत्तमजी नावंदर<br>श्री. महेशजी नावंदर | अहमदनगर | पिताजी | स्व सुभाषचंद्रजी नावंदर,<br>संगमनेर |
| २७ | ०९.०८.२०२४ | श्री.रामनिवासजी लड्ढा | पुणे | काकाजी | स्व श्री.राधाकिसनजी<br>भागीरथजी लड्ढा, पुणे |
| २८ | १२.०८.२०२४ | श्री.माणकचंदजी काबरा | मुंबई | काकीजी | स्व कमलबाई काबरा,<br>शेंदुर्णी |
| २९ | १४.०८.२०२४ | श्री.बालकृष्णजी धूत<br>श्री.विजयजी धूत,<br>श्री.सुशीलजी धूत | पुणे | माताजी | स्व श्रीमती सुरजबाई<br>मोतीलालजी धूत, पुणे |
| ३० | १४.०८.२०२४ | श्री.भूषणजी धूत,<br>श्री.अजयजी धूत,<br>श्री.विशालजी धूत,<br>श्री.विक्रमजी धूत | पुणे | दादीजी | स्व श्रीमती सुरजबाई<br>मोतीलालजी धूत, पुणे |
| ३१ | १६.०८.२०२४ | श्री निलेशजी परतानी | अमरावती | माताजी | स्व सौ.पुष्पलताजी<br>ओमप्रकाशजी परतानी,<br>अमरावती |
| ३२ | २०.०८.२०२४ | सौ.शालिनीजी मुंदडा | पुणे | बडी माँ सास | स्व.श्रीमती हुलासी बाई<br>मुंदडा, पुणे |
| ३३ | २९.०८.२०२४ | श्री राजेशजी कासट | पुणे | माताजी | स्व श्रीमती विमलबाई<br>कासट, पुणे |
| ३४ | २९.०८.२०२४ | श्री.नारायणदासजी राठी | ठाणे | धर्मपत्नी | स्व श्रीमती सुमनजी<br>नारायणदासजी राठी , ठाणे |
| ३५ | २९.०८.२०२४ | श्री संदिपजी राठी<br>सौ.अंजना राठी | ठाणे | माताजी<br>/सासुजी | स्व श्रीमती सुमनजी<br>नारायणदासजी राठी , ठाणे |
| ३६ | २०.०९.२०२४ | सौ.नंदाजी करवा | सोलापूर | सासूजी | |
| ३७ | ३०.०९.२०२४ | सौ.आशाजी भुतडा | पुणे | बहनोई | |

**यानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री अतुलजी लाहोटी यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी सभेला मंडळाच्या विविध उपक्रमांबाबत माहिती देतांना सांगीतले कि, मंडळाचे दोन महत्वपूर्ण प्रकल्प पूर्ण होऊन त्याचे उद्घाटन देखील करण्यात आले.**

त्यात पुणे येथिल वि.ना.लाहोटी विद्यार्थी भवन  पुर्ननिर्माण प्रकल्प हा सर्वसुविधांयुक्त अद्यावत असे वसतिगृह निर्माण झालेले आहे. याच्यात ३०० विद्यार्थी असून पूर्ण क्षमतेने भरलेले आहे. वसतिगृह कसे असावे याचे हे उत्तम उदाहरण म्हणून समोर आलेले आहे. मंडळाचे उपाध्यक्ष श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर यांच्या निरीक्षणात हा प्रकल्प पुर्ण करण्यात आला असून त्यांनी व त्यांच्या टिम ने हे काम उत्तम प्रकारे पार पाडलेले आहे. यानंतर मंडळाचा दुसरा प्रकल्प ऐरोली येथील नुवाल ॲण्ड पनपालिया वसतिगृह हा सर्वसुविधायुक्त असा प्रकल्प पुर्ण करण्यात आला. समाजातील १०४ दानदाते या प्रकल्पाला जुळले गेले. आशा आहे कि, याठिकाणीही पुर्ण क्षमतेने प्रवेश होतील. याकरिता याठिकाणी स्थानिय समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. दानदात्यांना जुळविण्याचे मोठे काम मंडळाचे विश्वस्त श्री.माणकचंदजी काबरा यांनी व त्यांच्या टिम ने केलेले आहे. मंडळाचा नविन उपक्रम MVPM International Connect मुळे मंडळाला दहा हजार लोक जोडली गेली आहेत. निश्चितच याचा फायदा मंडळाला होणार आहे. लवकर मंडळाचा MVPM International Matromony सुरू करण्याचा  मानस आहे.  मंडळाच्या ३८५ कार्यकर्त्यांमुळे अनेकानेक प्रकल्प, उपक्रम मंडळाकडून यशस्वीरित्या राबविले जातात. आताच्या काळात मंडळाकडे इतर संस्था रोल मॉडेल म्हणून बघतात हे सांगताना अभिमान वाटतो.

मंडळाच्या विविध शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जवळजवळ रू.४.२ करोड  मागील वर्षी वितरित करण्यात आलेले आहेत. यासोबत लॅपटॉप वितरण उपक्रम हा देखील यशस्वी झालेला आहे. याच्या अंतर्गत ५५० विद्यार्थ्यांना लॅपटॉप आजपर्यंत वितरित करण्यात आलेले आहेत. मंडळाचे विश्वस्त श्री.पुरूषोत्तमजी लोहिया यांच्या सहाय्याने मंडळाने सर्वप्रथम लॅपटॉप वितरण सुरू केले होते. भविष्यातही या उपक्रमाचा अनेक विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

मंडळातर्फे सुरू असलेल्या शाळा, महाविद्यालय, वसतिगृहे व इतर सर्व उपक्रम यशस्वीरित्या सुरू आहेत हे सांगताना आनंद वाटतो.

आता सभेला विषयानुरूप सुरू करू येणेप्रमाणे सभेला सुरू करण्यात  आले.

**विषय क्र.१:–मंडल की सर्वसाधारण सभा दि. २९.१०.२३ के इतिवृत्त को मंजूर करना ।**

सभाध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेला सांगीतले की, मागील सभेचा कार्यवृत्तांत सर्वांना दिलेला आहे. तसेच सदर इतिवृत्तांत संस्थेच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध करून देण्यात आला होता. तो आपण वाचला असेलच, त्यात  काही दुरूस्ती किंवा सुचना असल्यास सुचवाव्यात. येणेप्रमाणे सदर इतिवृत्तांत दुरूस्ती व सुचना नसल्याने मागीला सभेचा इतिवृत्तांत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक:–श्री.कालीदासजी जाजू
अनुमोदक:– सौ.नम्रताजी जाजू
ठराव:–सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२ :–मंडल संचलित सभी शाखाओंकी जानकारी लेना ।**

**व**

**विषय क्र.६ :– मंडल के सोलापूर मे. शुरू किए गये  CBSC स्कुल के निर्माण कार्य की जानकारी लेन तथा मुलुंड के श्रीमती ल.ला.मुंदडा वि भवन के पुर्ननिर्माण प्रकल्प की जानकारी लेना ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेला सोलापूर येथील सी.बी.एस.ई स्कुल निर्माण प्रकल्पासंदर्भात माहिती देतांना सांगीतले कि, एकूण तिन एकरच्या या प्लॅाटमध्ये आपण प्रीप्रायमरी, हायस्कुल इमारत व स्पोर्ट कॅाम्पलेक्स निर्माण करणार आहोत. जून २०२६ मध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे. एकूण ३२ कोटीचा हा प्रकल्प आहे. याच्यात  ॲाडीटोरिअम, अद्यावत क्लासरूम, इनडोअर, आऊटडोअर खेळाच्या सुविधा विविध लायब्रोटरीज, लायब्ररी, ओपन ऐरिआ, ॲम्पीथिएटर होणार आहेत. महाराष्ट्रातील नंबर एकची शाळा निर्माण करणार आहोत. यासाठी महाराष्ट्रातील नामांकित शाळांची भेट देखील कार्यकर्त्यांनी केलेल्या आहे. अद्यावत  व भविष्याची गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प आपण निर्माण करणार आहोत. यासाठी सोलापूरचे आपले कार्यकर्ते उत्साही आहेत त्यामुळे हे शक्य होणार असून यात शंका नाही. एकूण १,३८,००० स्कू.फूटाचे बांधकाम याठिकाणी होणार आहे. २७०० विद्यार्थी क्षमता असलेली शाळा ही सोलापूरच्य मध्यवर्ती भागात निर्माण होणार असून निश्चितच आपल्या नावलौकिकाशी साजेशी शाळा आपण सुरू करणार आहोत. समाजातील व उदारमना दानदाता मुंबई स्थित

आर.आर.काबेल ग्रुप चे सर्वेसर्वा श्री.श्रीगोपालजी काबरा व श्रीमती किर्तीजी काबरा यांनी उदारमनाने या सी.बी.एस.ई स्कुल प्रकल्पाला रू.६ कोटी घोषित केलेले आहेत व प्रीप्रायमरी इमारतीसाठी ही ते उदारदान देण्यासंदर्भात विचाराधिन आहेत. अ

यासोबत मंडळाच्या इतिहासातील सर्वात मोठा प्रकल्प श्रीमती ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवनचे पुर्ननिर्माण आपण सुरू करत आहोत. मुलुंड येथे अगदी प्राईम लोकेशनला आपले हे वसतिगृह आहे. याठिकाणी आपण एक इंटीग्रेटेड कॅाम्प्लेक्स तयार करत आहोत. ज्यामध्ये १८८ मुलांचे वसतिगृह, १०२ मुलींचे वसतिगृह, रेसीडेन्शीअल स्कील डेव्हलपमेंट सेंटर ४०० क्षमता असलेले, स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर १०० सिटर, हा एम.व्हि.पी.एम चा लॅण्डमार्क प्रकल्प असून याठिकाणी प्रत्येक वर्षी ८०० स्टूडंट आणि माहेश्वरी लाभ घेतील. साधारण एप्रिल २५ मध्ये हा प्रकल्प सुरू करण्याचा मानस असून जुन २८ पर्यंत पूर्ण होईल. याठिकाणी एकूण १.३० लाख स्क्वे फूटाचे बांधकाम होणार आहे व १८ मजली इमारत तयार होणार आहे. यासाठी मुंबई स्थित आर्किटेक्ट श्री.कुताब मांडवीवाला यांना आपण नियुक्त केलेले आहे. त्यांचा ही अनुभव प्रदीर्घ आहे. जसे कि आपणां सगळ्यांना माहिती आहे की, हा प्रकल्प खुप मोठा आहे. यासोबत सोलापूरचाही प्रकल्प आहेच म्हणून आपल्याला आर्थिक सहयोगाची आवश्यकता नक्कीच राहणार आहे. या दृष्टीकोणातून समाजातील अनेक मोठया लोकांना आपण संपर्क करायचे सुरू केलेले आहे. त्यातूनच आपल्याला मुलुंड प्रकल्पातील मुलांच्या वसतिगृहाला नाव देण्यासाठी श्री.राधाकिशनजी दमाणी यांनी मोठया उदारमनाने रू.७ करोड देण्याचे घोषित केले आहे. यासोबत आर आर काबेल ग्रुपचे श्री.श्रीगोपालजी काबरा यांनीही स्टार्टअप इन्क्युबेशनसाठी रू.४ करोड घोषित केले आहेत.

आपली सुरूवात अतिशय उत्तम झालेली आहे. नक्कीच समाज आपल्या पाठिशी उभा राहील याची खात्री आहे. यासोबत आपण ल.ला.मुंदडा विद्यार्थी भवनाच्या भूतपूर्व विद्यार्थ्यांना संपर्क करून त्यांचे गेट टूगेदर ठेवणार आहोत. कारण या विद्यार्थ्यांची वेगळया भावना या भवनाबरोबर जुळलेल्या आहेत. ॲल्युमिनी फोरम कसा बळकट करता येईल यासाठीही आपण काही पाऊले उचललेली आहेत. यावर सगळयांनी टाळ्या वाजवून समाधान व्यक्त केले.

यानंतर श्री.अतुलजी लाहोटी यांनी मंडळाच्या शाखानिहाय अहवाल प्रस्तुतीकरणासाठी सर्व शाखांचे अध्यक्ष व सचिव यांना आपल्या शाखेबाबत माहिती सभेसमोर सांगण्याचे आवाहन केले.

**श्री.अनुपजी बियाणी (वि.ना.लाहोटी हॅास्टेल):–** मागील वर्षी दोन टॅावरचे उद्घाटन झाले. आता पूर्ण क्षमतेने वसतिगृह भरलेले आहे. अजूनही वेटींग वर बरेच सिट्स् आहेत. पालकांकडून सिटस् संदर्भात विचारणा होत राहते. यामागील कारण म्हणजे आपण ज्या सुविधा वसतिगृहात देतो. त्याच्यात जीम, लायब्ररी, स्पोटर्स फॅसिलिटी वेगवेगळे इंव्हेटस् हे तर आहेच परंतू घरासारखे जेवण असल्यामुळे प्रत्येक पालक आपल्या पाल्याचा याठिकाणी प्रवेश घेण्यासाठी आग्रही असतो. प्रवेश क्षमता जास्त असल्यामुळे समितीमध्ये विभागणी करून वेगवेगळ्या कामांच्या जबाबदा–या आपण दिलेल्या आहेत त्यामुळे काम करणे सोपे झालेले आहे.

**सौ.शिलाजी जाजू (आर.बी.एच.आर हॅास्टेल):–** यावर्षीही प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडली. या कालावधी मध्ये प्रेशर असतेच. परंतु सोयीस्कर प्रणालीमुळे सोपे होते. वसतिगृहातील इव्हेंट सुरूच आहेत. पुढील वर्षी जीमची सुविधा सुरू करण्याचा मानस आहे. सर्व समिती अतिशय उत्तम काम करत आहे.

**सौ.अंजलीजी करवा ( हि.रा.राठी हॅास्टेल):** – प्रत्येक वर्षाप्रमाणे वर्षाची सुरूवात विद्यार्थिनींच्या मेडीकल चेक–अप ने करण्यात आली. यावर्षीही सगळ्या स्ट्रीमच्या मुलींनी आपल्याकडे प्रवेशीत करण्यात आलेले आहे. मेरीट वर प्रवेश दिल्यामुळे प्रक्रिया सोयीस्कर झाली. वर्षभरातील कार्यक्रम नियोजीत करण्यात आलेले आहेत. मंडळाचे नेहमी सहकार्य असते ते असेच रहावे ही विनंती.

**सौ.पुष्पाजी राठी (निरंतर हॅास्टेल):–** वर्ष २०१८ पासून निरंतर वसतिगृह सुरू झाले सुरूवातीला हे कोथरूड मध्ये होते. तेव्हा ७५ मुली होत्या. परंतू प्रवेशासाठी खुप मागणी होती म्हणून आपण सदर हॅास्टेल सोडले व कर्वेनगर येथे १०० मुलींचे हॅास्टेल भाडे तत्वावर घेतले. संपूर्ण क्षमतेने वसतिगृह भरलेले आहे. इतर हॅास्टेल प्रमाणे याठिकाणीही सगळे कार्यक्रम नियोजन बध्द केले जातात. आता आम्ही अजून एक हॅास्टेल मंडळाकडे मागणी करत आहोत.

**श्री.कृष्णकांतजी लखोटिया (लक्ष्मी हॉस्टेल):** –लक्ष्मी वसतिगृहासाठी क्षमता २०९ विद्यार्थ्यांची आहे. प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी संपूर्ण क्षमतेने हॉस्टेल भरलेले आहे. व वेटींग वर बरेच सिटस् ठेवण्यात आलेले आहेत. प्रवेश दिल्या गेलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आपण १०/१५ सिटस् स्वावलंबनसाठी आरक्षित केलेल्या आहेत. मंडळाच्या स्टॅण्डर्ड प्रमाणेच सर्व सुविधा आपण याठिकाणी देत आहोत. विद्यार्थ्यांसाठी वेनस्डे विस्डम सारखे फ्लॅगशीप कार्यक्रम आपण सुरू केलेले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यासोबत बॉक्स क्रिकेट सारखे खेळांचे आयोजन आपण करत असतो. त्यामुळे सर्वसामवेश विकास मुलांचा घडत असतो. यासोबत विद्यार्थ्यांचे हायजीन कडे देखील काटेकोरपणे लक्ष दिले जाते. मंडळाचा नेहमी सपोर्ट आम्हाला वेळोवेळी मिळत आलेला आहे. त्यामुळे काम करतांना आनंद मिळतो.

**श्री.अमोलजी करवा (बाणेर बॉईज हॉस्टेल ):**– आमचे हॉस्टेल म्हणजे मागेल त्याला प्रवेश असे आहे. कारण याठिकाणी आपण विद्यार्थ्यांबरोबर वर्कींग बॅचलर्सला देखील प्रवेश देतो. आमच्याकडे टेम्परारी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवेश घेतात. विद्यार्थ्यांसाठी विविध सेमीनार आपण आयोजित करतो. यासोबत याठिकाणी इन्क्युबेशन सेंटर देखील आपण उपलब्ध केलेले आहे. मुलांचा संपूर्ण विकास कसा होईल याकडे लक्ष दिले जाते.

**श्री.लक्ष्मीनारायणजी मुंदडा (एल.एल.मुंदडा हॉस्टेल)**:–यावर्षी ८५ मुलांना प्रवेश देण्यात आलेला आहे. पुण्याप्रमाणे सर्वेच नाही. परंतू विद्यार्थ्यांच्या वेळेनुसार समतोल साधून इव्हेंट केले जातात. सी.ए. विद्यार्थी याठिकाणी प्रवेश घेतात.

**श्री.मधुसुदनजी सारडा (मुरलीधर सारडा विद्यार्थी भवन):–** याठिकाणी १५ विद्यार्थी आहेत. वसतिगृहाचे रिनोव्हेशनचे काम सुरू असल्यामुळे प्रवेश कमी झालेले आहेत. उच्च शिक्षणासाठी याठिकाणी येणारे विद्यार्थी पुण्या मुंबई ला प्राधान्य देत आहेत. म्हणून आपण सी.बी.एस.ई शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. परंतू याठिकाणी सी.बी.एस.ई शाळा करणे शक्य होणार नाही. हे आभ्यासानंतर लक्षात आले.

**सौ.मंदाकिनीजी काबरा (नुवाल ॲण्ड पनपालिया हॉस्टेल):–** या वसतिगृहाचे याच वर्षी उद्घाटन झालेले आहे. हळू हळू प्रवेश ५५ पर्यंत पोहचले आहेत. वसतिगृहाचा प्रचाराचे काम सुरू आहे. त्यामुळे लवकरच सदर वसतिगृह पुर्ण क्षमतेने भरेल. वसतिगृहाची समिती स्थापन करण्यात आली आहे. नविन असल्यामुळे सगळ्या समितीला मंडळाच्या इतर वसतिगृहाप्रमाणे कार्य करणे सुरूवातीला जमणार नाही. परंतू सर्व समिती उत्साही आहे. लवकरच सगळया बाबी समजून घेऊन या वसतिगृहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटीबध्द आहे. मंडळाकडून योग्य ते सहकार्य प्राप्त होत आहे. त्यामुळे प्रोत्साहन मिळते.

**सौ.प्रतिभाजी काबरा (श्रीमती दुर्गाबाई लोहिया हॉस्टेल):**– माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ व श्री मुकुंद भवन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने नव्याने सुरू झालेले वसतिगृहात एकूण ११६ पैंकी ११० प्रवेश झालेले आहेत. सर्व सुविधा व इंव्हेट मंडळाच्या इतर वसतिगृहाप्रमाणे याठिकाणी करण्यात आलेले आहेत. याठिकाणी ३ सिटर रूमस् असून ॲटॅच टॉईलेट बाथरूम ही एक वेगळी सुविधा देण्यात आलेली आहे. या वसतिगृहासाठी देखील एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. याठिकाणी प्रत्येक १० मुलींना एक मेंटार देण्यात आलेला आहे. जो त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाचा आढावा घेऊन गाईडंस करत असतो. त्यामुळे विद्यार्थीनींना वेगळा आत्मविश्वास  निर्माण झालेला आहे.

**श्री.सचिनजी मंत्री (महेश विद्यालय):–** महेश विद्यालय येथे मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा दोन शिफ्ट मध्ये सुरू आहेत व यावर्षी ही नेहमी प्रमाणे संपूर्ण क्षमतेने दोन्ही माध्यम भरलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून विविध कार्यक्रम, गाईडन्स्, काउन्सेलिंग केले जाते व शैक्षणिक प्रगतीवर ही लक्ष केंद्रित केले जाते. नेहमी प्रमाणे दोन्ही माध्यमाचा निकाल हा १००% लागलेला आहे. उत्तम दर्जा असल्यामुळे पालक वर्ग ब–याच प्रमाणात महेश विद्यालयाला प्राधान्य मागील काही वर्षापासून देत आहोत.

**सौ.वंदनाजी मुंदडा (महेश बालभवन):–** महेश बालभवनचे काम अतिशय उत्तम पध्दतीने सुरू आहे. वेगवेगळ्या खेळांमुळे बालभवनचे नाव पुण्यातील पहिल्या पाच बालभवन मध्ये घेतले जाते. जवळ जवळ १५०० विद्यार्थी येथे येतात. विविध प्रतियोगिता इव्हेंटस्‌मुळे पालकांचा आकर्षणाचा केंद्र बिंदू बालभवन मानले जाते.

**श्री.मनिषजी भट्टड (स्कॉलरशीप):–**मंडळाकडून यावर्षी रू.११४ लाख वितरित करण्यात आले असून लॅपटॉप डिस्ट्रीब्युशन कार्यक्रमाच्या माध्यमातून होतकरू विद्यार्थ्यांना लॅपटॉप दिले गेले. कोरोना काळानंतर श्री.मुकुंदभवना ट्रस्टच्या सहाय्याने ही सुरूवात करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या प्रमुख शहरांमध्ये लॅपटॉप वितरणाचा कार्यक्रम समिती मार्फत करण्यात आला आहे. प्रायव्हेट ट्रस्ट चा ही कोष आपण वाढविला आहे. प्रत्येक माहेश्वरी गरजू मुलाला छात्रवृत्तीच्या माध्यमातून मदत करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**श्री.सचिनजी चांडक (स्वावलंबन योजना):–** स्वावलंबन योजनेचे प्रणेत स्व.श्री.रामकुमारजी राठी यांच्या नावाने ही योजना आता सुरू आहे. याच वर्षी हा नामकरण समारोह संपन्न झाला. त्यांचे नाव जुडल्यामुळे समीतीचे अजूनच प्रोत्साहन वाढलेले आहे. योजने संदर्भात किर्तीश्री फाउंडेशन च्या सौ.किर्तीजी काबरा यांनी माहिती विचारली व त्यांनी उदारमनाने मदत केली. आपला या योजनेमध्ये विद्यार्थी वाढविण्याचा प्रयत्न आहे. परंतु याकरिता अतिशय माईक्रो पातळीवर काम करणारे लोक जोडली गेली पाहीजे आहेत. या योजनेत प्रवेशीत विद्यार्थी अतिशय आनंदी आहेत. त्यांचे उद्याचे भविष्य त्यांना आज दिसत आहे. सर्व समिती मेंटार्स उत्तम करत आहेत.

**श्री.अमितजी चांडक (सिव्हिल सर्व्हिसेस):–**मंडळाचा या उपक्रमात वर्ष २०१४ पासून एकूण १८४ विद्यार्थ्यांना प्रवेशीत केले गेले. अनेक विद्यार्थी चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. या सिव्हिल सर्व्हिसेस् मध्ये कमी विद्यार्थी आवड ठेवतात किंवा या क्षेत्रात करीअर बनण्यासाठी प्राधान्य देत नाही. हल्लीच्या काळात यासंदर्भात जागरूकता वाढली आहे. या विद्यार्थ्यांना आपण मेरीटप्रमाणे मंडळाकडून छात्रवृत्ती देखील देतो. विद्यार्थ्यांसाठी अॅप्टीट्युड टेस्ट आपण आयोजित करतो. विविध गाईडन्स सेमीनार ही घेतो. वर्ष २०२३–२०२४ मध्ये आपली विद्यार्थीनी AIR-4 येऊन तिने इंडियन फॅारेस्ट सर्व्हिस जॅाईट केले. यासोबत बस कु.नम्रता मुंदडा, कु.अजय बाहेती, कु.श्रीकांत झंवर यांचे ही चांगल्या पोस्ट वर सिलेक्शन झालेले आहे.

**सौ.मंगलजी काबरा (दमाणी विद्या मंदीर):–** दमाणी विद्या मंदीर शाळेत आजच्या तारखेला १५८०विद्यार्थी शिक्षण घेत आहे. अतिशय उच्च दर्जाचे शिक्षण देणारी शाळा म्हणून आपले नाव आहे. त्याच बरोबर शैक्षणिक सगळ्या विषयांच्या राज्यस्तरिय, जिल्हा स्तरिय प्रतियोगितेमध्ये शाळा सहभाग घेऊन पारितोषिक प्राप्त करते. शैक्षणिक बरोबर सर्वांगिण विकासाचे आवश्यक सगळे उपक्रम, खेळ याठिकाणी घेतले जातात.

**श्री.योगेशजी बियाणी ( महेश इंग्लिश स्कुल व स.रा.चंडक हायस्कुल):–**दोन्ही शांळाचे शैक्षणिक निकाल दरवर्षी प्रमाणे १००% असतातच यासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर मोठया प्रमाणावर भर दिला जातो. विविध प्रतियोगितामध्ये शाळा सहभाग घेत असतात. त्यासोबत स्कील डेव्हलपमेंटचेही कार्यक्रम घेतले जातात. शाळेचे शिक्षक खुप मेहनत घेतात. त्यांच्यासाठी विविध ट्रेनिंगही घेतली जातात. त्यामुळे सोलापूरातील सर्वाधिक मागणी असलेली शाळा म्हणून आपली शाळा ओळखली जाते.

**श्री.मधुजी केला (डी.एच.बी सोनी महाविद्यालय ):–** आपले महाविद्यालयातील अॅकॅडमीक निकाल उत्कृष्ठ आहे. वाणिज्य विभागाचे विद्यार्थ्यांसाठी तसेच सीए फाउंडेशनसाठी अॅस्पायर बॅचच्या माध्यमातून विविध कोर्सेस आपलेच शिक्षक चालवतात. यावर्षीच्या निकालात कु.वैभवी व कु.तनिष्का यांनी चांगले गुण संपादित केले. प्रतिभा खोज या टॅलेंट सर्च परिक्षेचे देखील आपल्या महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. क्रिडा क्षेत्रातही राज्य स्तरीय, जिल्हा स्तरावरती विद्यार्थ्यांनी यश मिळविले. महाविद्यालयात प्लेसमेंट देखील आयोजित करण्यात आले. त्यात महाविद्यलयाच्या ब–याच विद्यार्थ्यांचे चयन झाले व चांगल्या कंपन्यामध्ये जॅाब्स मिळाले. एकूण महाविद्यालयाचे कार्य उत्तम प्रकारे सुरू आहे.

**श्री.परागजी राठी (फायनान्स कनेक्ट)** :- मागील वर्षभरात फायनान्स कनेक्टच्या माध्यमातून फायनान्स च्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रातील तज्ञ  मान्यवरांचे इंटरॅक्शन सेशन ठेवण्यात आले. तसेच अशा मंडळीचे एक पॅनल तयार करण्यात आले आहे. साधारण २२० लोकांचा एक ग्रुप बनवला गेला आहे. यासोबत बिगीन अगेन यामाध्यमातून महिला ज्या काही कारणासाठी आपले प्रोफेशन पासून दुर गेलेले असतात  त्यांना प्रवाहात आणण्यासाठीही उपक्रम राबविले गेले.

**श्री.निर्मलजी तोष्णीवाल (द्रोणालया ):**- द्रोणालयाच्या ३ बॅचेसचे आयोजन करण्यात आले. सीनिअर प्रमाणे आता ज्युनिअर द्रोणालया ही आपण सुरू केले. दोन्ही बॅचेस पुर्ण क्षमतेने भरल्या. भारता बाहेरून स्टूंडस्ने प्रवेश घेतला. द्रोणालयात अनेक विषयांवर मार्गदर्शन केले जाते. त्या-त्या क्षेत्रातील तज्ञ आपण यासाठी बोलवित असतो. यासोबत इंडस्ट्रीअल व्हिजीट पिकनीक आयोजित करण्यात येते. डॉ.सुनंदाजी राठी, श्री.अभिजीतजी काबरा, श्री.शैलेशजी मालू यांना आपण ३ बॅचेसच्या समारोपाला प्रमुख पाहूणे म्हणून बोलविले होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले.

**श्री.अभिजीतजी कासट (एम.व्हि.पी.एम अल्युमिनी):**- यावर्षी आपण सोशल कनेक्ट च्या माध्यमातून रक्तदान शिबीराचे आयोजन केले. या शिबीराचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले. आपल्या भूतपूर्व विद्यार्थ्यांच्या सहकार्यानेच हे शक्य झाले. दूस-या शिबीरात जवळजवळ १९०० बॅाटल्स जमा झाल्या. तसेच पुढे जानेवारी मध्ये आओ फीर मिले हम करणार आहोत. त्याच प्रमाणे होली मिलन, अ‍ॅल्युमिनीप्रिमिअर लिग आपण आयोजित केले.

**विषय क्र.३ :- वर्ष २०२३-२०२४ के ऑडीटेड आय-व्यय पत्र तथा तुलन पत्र को स्वीकृती देना ।**

**व**

**विषय क्र.४ :- वर्ष २०२४-२०२५ के वित्त संकल्प की जानकारी लेकर स्वीकृती देना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.अमोलजी भट्टड यांनी सभेसमोर प्रस्तुती करण्याच्या माध्यमातून आय-व्यय पत्र व तुलन पत्र तसेच वर्ष २०२४-२०२५ चा अर्थ संकल्प सभेसमोर सादर केला. त्यांनी माहिती दिली कि, मंडळाला वर्ष २०२३-२०२४ मध्ये रू.९ कोटी प्रॅाफीट झाला आहे. ग्रॅास रिसीट रू.३६ करोड च्या झाल्या आहेत. कॅपीटल एक्स्पेन्डीचर  रू.३० करोड झालेला आहे. रू.७ करोड डोनेशन आपल्याला मिळालेले आहे. आपण साधारण रू.४ करोड छात्रवृत्तीच्या माध्यमातून वितरित केले आहे. अर्थ संकल्प व ऑडीटेड लेखापत्र सभेसमोर प्रस्तुतीकरणाव्दारे सभेसमोर दाखविण्यात आले.

# MVPM Financial Statement  Net Surplus/deficit FY.2023-24

(Amount in Rs.Lakh)

| Sr.No. | Unit Name | Audited FY 21-22 | Audited FY 22-23 | Audited FY 23-24 | Budgeted 2024-25 |
|---|---|---|---|---|---|
| A | Maheshwari Vidya Pracharak Mandal | -60.42 | -97.21 | -117.49 | -347.79 |
| B | V.N.Lahoti Vidyarathi Bhavan | -14.51 | 92.19 | 71.44 | 27.83 |
| C | RBHR Rathi Vidyarathi Bhavan | 26.95 | 58.44 | 53.90 | 53.53 |
| D | H.R. Rathi Vidyarathi Bhavan | 41.53 | 94.97 | 98.13 | 73.98 |
| E | L.L.Mundada Vidyarathi Bhavan | 0.43 | 67.47 | 54.60 | 38.01 |
| F | Murlidhar Sarda Vidyarathi Bhavan | -3.34 | -6.81 | -4.24 | -0.60 |
| G | Laxmi Hostel (Rented Property,Pune) | 10.20 | 50.18 | 40.05 | 39.86 |
| H | Baner Hostel (Rented Property,Pune) | -7.20 | 32.11 | 47.30 | 19.75 |
| I | Nuwal & Panpaliya Girls Hostel | - | - | -67.66 | -85.46 |
| J | Nirantar Hostel (Rented Property,Pune) | -7.70 | 1.94 | -11.54 | 30.14 |
| **B to J** | **Total All Hostel** | **46.37** | **390.50** | **281.97** | **197.05** |
| K | Mahesh Vidyalaya Marathi Medium,Pune | 43.41 | 31.78 | 13.40 | 13.13 |
| L | Mahesh Vidyalaya English Medium,Pune | 171.91 | 104.83 | 169.67 | 124.66 |
| M | Mahesh Bal Bhavan, Pune | 9.45 | 21.68 | 26.21 | 8.55 |
| N | Damani Marathi School, Solapur | 76.31 | 30.47 | 23.94 | 21.95 |
| O | Chandak English School, Solapur | 179.58 | 170.32 | 125.11 | 97.32 |
| P | Deshbhakha H. B. Soni Collage | 7.54 | -28.39 | 10.47 | 28.02 |
| **K to P** | **Total All School** | **488.21** | **330.71** | **368.81** | **293.63** |
| | **Grand Total  Surplus (Defecit)** | **474.15** | **624.01** | **533.29** | **142.89** |
| | Deprication on Movable Assets | 92.02 | 117.11 | 116.56 | 131.31 |
| | Depreciation on Old Building | 145.29 | 145.85 | 127.90 | 79.10 |
| | Depreciation on New Building-VNL | - | - | 85.48 | 120.00 |
| | Depreciation on New Building-Nuwal | - | - | 56.33 | 100.00 |
| | **Total Depreciation** | **237.31** | **262.96** | **386.28** | **430.41** |
| | **Profit before deprecation & 10B Investn** | **711.47** | **886.97** | **919.57** | **573.30** |
| | Gross Receipts- all units | 2265.93 | 3282.70 | 3609.44 | 3922.48 |
| | Gross Expenditure- all units-Less Trf | 1791.78 | 2658.70 | 3076.15 | 3779.58 |
| | FD closing Balances - all units | 2669.44 | 3357.01 | 3240.90 | 2500.00 |
| | Capital Expenditure | 1005.40 | 674.72 | 1570.98 | 2939.90 |

## AUDITED FINANCIAL

Amount in Rs. Lacs.

| Particulars | FY 21-22 | FY 22-23 | FY 23-24 |
|---|---|---|---|
| Gross Receipts | 2,266 | 3,283 | 3,609 |
| Gross Expenditure | 1,792 | 2,659 | 3,076 |
| Net Surplus | 474 | 624 | 533 |
| FD Closing Balances | 2,669 | 3,357 | 3,241 |
| Capital Expenditure | 1,005 | 675 | 1,571 |
| Donation Received | 494 | 596 | 700 |

## Scholarships & Others (Rs. in Lacs)

| Particulars | FY 21-22 | FY 22-23 | FY 23-24 |
|---|---|---|---|
| Scholarship Corpus Fund | 619 | 791 | 916 |
| Manikbhau Kabra Kosh (Asahaya Vyakti Sahayata) | 33 | 59 | 84 |
| Corpus Fund | 652 | 850 | 1,000 |
| Laptop Donation in Rs. Lacs | 43 | 76 | 90 |
| Scholarship Distribution in Rs.Lacs (including Hostel Freeship, Swavlamban, Civil Services, Setu Expenses, Global Star ) | 115 | 212 | 305 |
| Asahaya Vyakti Sahayata Distribution Rs.in Lacs | 9 | 9 | 9 |
| Total Amt. Distribution | 167 | 296 | 404 |

यानंतर सर्वसाधारण सभेने आयव्यय व तुलन पत्र तसेच अर्थसंकल्पावर विस्तृत चर्चा करून त्यास खालील ठरावाप्रमाणे मंजूरी दिली ती खालील प्रमाणे :-

ठराव:- माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या वर्ष २०२३-२०२४ चे ऑडीटेड आयव्यय पत्र व तुलन पत्र तसेच वर्ष २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पास आजची सर्वसाधारण सभा एकमताने मंजूर करून त्यास स्वीकृती देत आहे.

सुचक :– श्री.सचिनजी मंत्री
अनुमोदक:– श्री.लक्षमीनारायणजी मुंदडा
ठराव:– सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ :– वर्ष २०२४–२०२५ के हिसाब की जाँच के लिये लेखा परिक्षक की नियुक्ती एवं उनका परिश्रमीक निश्चित करना ।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.अमोलजी भट्टड यांनी सभेस सांगीतले की, मागील वर्षी मंडळाचे लेखा परिक्षकाचे काम मे.व्हिडीए.असोसिएटस्ने उत्तमरित्या पाहिले आहे.
तसेच इतर शासकीय पाठपूरावा देखील त्यांनी व्यवस्थित केलेला आहे म्हणून सभेने त्यांच्या फेर नियुक्तीचा विचार करावा असे वाटते.

यानंतर सर्वसाधारण सभेत याविषयी चर्चा करण्यात आली व मे.व्हिडीए.असोसिएटस् यांनी मागील वर्षी व्यवस्थित काम पाहिले आहे म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांच्या मागील वर्षीच्या मानधनामध्ये १०% ने वाढ करण्यात यावी असे आजची सभा ठरवित आहे. येणेप्रमाणे खालील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:–** मंडळाचे लेखा परिक्षक मे. व्हिडीए.असोसिएटस यांनी वर्ष २०२३–२०२४ मध्ये त्यांची जबाबदारी, कार्य व्यवस्थित पार पाडली त्यामुळे त्यांची वर्ष २०२४–२०२५ करिता पुनश:च नेमणूक करण्यात येत असून त्यांच्या वर्ष २०२३–२०२४ च्या मानधनामध्ये १०% वाढ करण्याचे आजची सर्वसाधारण सभा एकमताने ठरवित आहे.

सुचक :– श्री. सचिनजी भट्टड
अनुमोदक:– श्री. अनुपजी बियाणी
ठराव:– सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.७ :– मा.अध्यक्ष की अनुमति से अन्य विषयोंपर चर्चा एवं निर्णय ।**

**नंदकिशोरजी राठी :–** मंडळाची ही वर्ष २०२४ सर्वसाधारण सभा आहे. वर्ष २०२५ च्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील तीन वर्षाच्या कालावधीकरिता विविध पदांच्या नियुक्त्या होणार आहेत. येणा–या टीममध्ये नविन लोक जुळतील त्यांना आतापासूनच कामांचा गोषवार समजण्यासाठी मंडळाच्या कार्यांमध्ये जुळवण्याचा प्रयत्न करावा.

**बजरंगदासजी लोहिया :–**अहिल्यानगरच्या प्रांगणात शाळा करावी कि नाही ते बघावे परंतू स्कील डेव्हलपमेंट सेंटर त्याठिकाणी करावे असे वाटते. त्यासोबत सोलापूर येथे सिव्हिल सर्व्हिसेस सेंटर साठी प्रयत्न करावे.

यानंतर सभाअध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी मनियार ट्रस्टच्या संदर्भात माहिती देतांना सांगीतले कि, मनियार ट्रस्टच्या मॉडेल कॅालनी याठिकाणच्या प्लॅाट साठी श्री. धनकुडे यांच्यासोबत सेटलमेंटची चर्चा अंतिम टप्यात आहे. त्यांना रू.३.५ कोटी मध्ये सेटल करण्याची योजना आहे. याकरिता माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाकडून आपण ३ कोटी देण्याचे ठरले आहे. सर्व प्रक्रिया झाल्यानंतर आपण या दोन्ही ट्रस्टच्या विलिनीकरणासंदर्भात निर्णय घेणार आहोत.

**श्री.किशोरजी चंडक:–** यांनी सर्वसाधारण सभेत आपली नाराजी व्यक्त करतांना माहिती दिली कि,चंडक परिवार मंडळाचे सर्वात जुन्या दानदाता परिवारापैकी एक दानदाता आहेत. तरी चंडक परिवाराला मंडळाकडून हवी तशी वागणूक किंवा ६० वर्षापासून कधी कुठले पद दिले गेले नाही. बालक मंदीर व वि.भवनाचे नाव कुठेही घेतले जात नाही किंवा घेतले गेले नाही. सोलापूरात वि.भवनाचे निर्माण १९४५ रोजी सुरू झाले त्यानंतर १९६५ मध्ये दमाणी विद्या मंदीरचे निर्माण झाले. जेव्हा चंडक स्कुलचे बांधकाम केले तेव्हा सदर काम चंडक ला का नाही मिळाले. मंडळाला जुन्या दानदात्यांचा विसर का पडला आहे? हे

सगळे प्रश्न अनुत्तरीत  आहे. त्यामुळे चंडक परिवाराच्या भावना कुठेतरी दुखावल्या गेल्या आहेत. आपण यावर काय विचार करणार आहात. याचा आज सर्वसाधारण सभेसमोर सांगावे.

**श्री.अतुलजी लाहोटी:–**  माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाचे आज एक रोपट्याचे वटवृक्ष झालेले आहे. ते केवळ आणि केवळ आपल्या जुन्या दानदात्यांमुळे व कार्यकर्त्यांमुळेच श्री.किशोरजी चंडक यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या भावना मंडळापर्यंत पोहचल्या आहेत. काळाच्या ओघात किंवा अनावधानाने हे सगळ घडलेले आहे. चंडक परिवाराला मंडळाच्या कार्यामध्ये व त्यांना पुनश:च मंडळाशी कसे जोडता येईल. यासाठी प्रयत्नशील राहुयात. त्यांनी मोठया मनाने मंडळाला संधी द्यावी. त्यांची नाराजी मंडळ नक्कीच दुर करेल. अशा भावना मी व्यक्त करतो.

यानंतर मंडळाचे जेष्ठ सदस्य व समाजसेवक श्री.विठ्ठलशेठजी मनियार यांनी मंडळाकडून सुरू असलेल्या कार्यांचे कौतुक केले. पुढे ही वाटचाल अशीच सुरू ठेवावी असे सांगीतले.
मंडळाचे सचिव श्री.अश्विनजी चंडक यांनी सर्वसाधारण सभेत उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सभाध्यक्ष**